"सहायक कक्ष अधिकारी" मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा-२०१७ मधील शिफारसप्राप्त उमेदवारांचे मंत्रालयीन विभागात नियतवाटप

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन आदेश क्रमांकः मविप १४१७/प्र.क्र. १८६/१४-अ

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: ३० डिसेंबर, २०१७

आदेश

मंत्रालयीन विभागातील व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयातील लिपिक, लिपिक-टंकलेखक व टंकलेखक संवर्गातील कर्मचाऱ्यांना सहायक कक्ष अधिकारी पदावर निवडीद्वारे नियुक्ती देण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक २५.०६.२०१७ रोजी सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा-२०१७ घेण्यात आली होती. सदर परीक्षेमधून आयोगाने एकूण ५० उमेदवारांची सहायक कक्ष अधिकारी पदावर निवडीने नियुक्तीसाठी शिफारस केली आहे.

२. सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २५.०५.२००४ च्या शासन निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण हे पदोन्नतीच्या सर्व टप्प्यांवर लागू करण्यात आले आहे. पदोन्नतीने सेवाभरतीसाठी, मा. उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. २७९७/२०१५ प्रकरणी दिनांक ४.८.२०१७ रोजी पदोन्नतीच्या सर्व टप्प्यांवर आरक्षण लागू करण्याबाबतचा दिनांक २५.०५.२००४ चा शासन निर्णय रद्दबातल ठरविला आहे. यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाच्या उक्त निर्णयास स्थगिती देण्याच्या अनुषंगाने राज्य शासनाकडून सर्वोच्च न्यालयात विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदरहू विशेष अनुज्ञा याचिका प्रलंबित असल्याने मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश होईपर्यंत सर्व स्तरावरील पदोन्नती प्रक्रीया स्थगित ठेवण्याबाबतच्या सुचना सामान्य प्रशासन विभाग, शासन पत्र क्रमांक : बीसीसी २०१७/प्र.क्र.३१२A भाग-१/१६-ब, दिनांक २.११.२०१७ च्या पत्रान्वये देण्यात आल्या होत्या. आता, राज्यातील सर्व स्तरावरील पदोन्नतीची प्रक्रीया पुर्णपणे ठप्प झाली असल्याने सामान्य प्रशासन विभाग, शासन पत्र क्रमांक : बीसीसी २०१७/प्र.क्र.३१२A/१६-ब, दिनांक २९.१२.२०१७ च्या पत्रान्वये "पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून भरण्यात यावीत. अशी कार्यवाही करतांना सेवाज्येष्ठता यादीमधील मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती देण्यापुर्वी ते दिनांक

२५.५.२००४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार आरक्षणाचा लाभ मिळून सेवाज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले नाहीत, याची खात्री प्रत्येक प्रशासकीय विभागाने करावी." अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

३. सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा २०१७ मधून आयोगाने जरी ५० उमेदवारांची सहायक कक्ष अधिकारी पदावर निवडीने नियुक्तीसाठी शिफारस केली असली तरी, सामान्य प्रशासन विभाग/कार्यासन १६-ब यांनी दिनांक २९.१२.२०१७ च्या पत्रान्वये दिलेल्या सूचना व प्रस्तुत प्रकरणी सामान्य प्रशासन विभाग/कार्यासन १६-ब यांनी "गुणवत्तेनुसार खुल्या प्रवर्गातील पदे भरण्याबाबत कार्यवाही करावी" असे अभिप्राय दिले आहेत. त्यानुसार सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा २०१७ मधून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या ५० उमेदवारांपैकी ज्यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने खुल्या प्रवर्गातून शिफारस केली आहे केवळ अशाच ३२ उमेदवारांचे नियतवाटप सोबतच्या परिशिष्ट “अ” मध्ये दर्शविल्याप्रमाणे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येत आहे. सदर आदेश मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ च्या निर्णयाच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहेत याची संबंधितांनी नोंद घेण्यात यावी. उमेदवारांनी सदर नियुक्तीचा स्वीकार या आदेशाच्या तारखेपासून **सात दिवसांत** करावा. मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, ह्या उमेदवारांचे नेमणूकीचे आदेश तत्काळ निर्गमित करावेत. सदरहू आदेशामध्ये त्यांची पदस्थापना निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात व मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ च्या निर्णयाच्या अधिन राहून करण्यात येत असल्याबाबतचा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा. तसेच, ज्या उमेदवारांचे नियतवाटप विभागाच्या बाहेर करण्यात आले आहे, त्यांना तात्काळ कार्यमुक्त करावे व संबंधित आदेशाच्या प्रती या विभागाला पाठवाव्यात.

४. जे उमेदवार विहित मुदतीत नियुक्तीचा स्विकार करतील त्यांची ज्येष्ठता या आदेशाच्या तारखेपासून धरण्यात येईल व त्यांची आपापसातील ज्येष्ठता त्यांच्या गुणवत्ता क्रमांकानुसार धरण्यात येईल. जे उमेदवार विहित मुदतीनंतर नियुक्ती स्वीकारतील त्यांची ज्येष्ठता अबाधित राहणार नाही.

५. सर्व उमेदवार सेवाप्रवेश नियमानुसार व सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : मविप १४१६/प्र.क्र.११९/१४-अ, दिनांक १८.०४.२०१७ च्या परिपत्रकानुसार सर्व अटींची पूर्तता करीत असल्याचे संबंधित विभागांनी

परिशिष्ट-६ मध्ये प्रमाणित केले आहे. यास्तव त्यांचे नियुक्तीचे आदेश निर्गमित करताना विभागांनी त्याबाबतची खात्री करावी. त्यासाठी नियतवाटप करण्यात आलेल्या उमेदवारांची आवेदनपत्रे सोबत पाठविण्यात येत आहेत. तरीदेखील खालील बाबींची तपासणी करण्याच्या अधीन राहून नियुक्ती आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी करावी :-

(अ) उमेदवारांनी लिपिक-टंकलेखक पदाची सेवाप्रवेशोत्तर परीक्षा विहित कालावधीत उत्तीर्ण केली आहे.

(ब) मागासवर्गीय उमदेवारांचे जाती/जमातीचे दावे वैध ठरले आहेत.

(क) उमेदवारांविरुध्द न्यायालयीन प्रकरणे/फौजदारी खटले/विभागीय चौकशी चालू अथवा प्रलंबित नाही. तसेच, कोणत्याही उमेदवाराबाबत शिक्षेचा अंमल चालू नाही.

६. हे आदेश तत्काळ अंमलात येतील, संबंधित उमेदवारांनी त्यांच्या पदस्थापनेत बदल करण्यासंबंधीच्या विनंतीची दखल घेण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१२३०१२०५५८५१०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Gajanan Bhimrao Gurav

Digitally signed by Gajanan Bhimrao Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration, postalCode=400032, st=Andhra Pradesh, 2.5.4.20=8a5b973b0795ae988a7c005050f9180a8021798a5c1ed41ada8a72725a47b4f0, cn=Gajanan Bhimrao Gurav
Date: 2017.12.30 12:10:35 +05'30'

(ग.भि.गुरव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

सर्व संबंधित कर्मचारी (संबंधित मंत्रालयीन विभागामार्फत)

प्रत,

१) अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव (आस्थापना), संबंधित मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

२) सह/उप सचिव (आस्थापना), संबंधित मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

३) निवड नस्ती/संग्रहार्थ (साप्रवि/कार्यासन १४-अ)

शासन आदेश क्रमांक: मविप १४१७/प्र.क.१८६/१४-अ, दिनांक ३० डिसेंबर, २०१७ सोबतचे परिशिष्ट "अ"

अ.क्र.	श्री/ श्रीमती	कर्मचाऱ्याचे नांव	गुणवत्ता क्रमांक	परीक्षेचे वर्ष	मलोआने ज्या प्रवर्गातून शिफारस केली तो प्रवर्ग	कर्मचाऱ्याचा जाती प्रवर्ग	सध्याचा विभाग	पदस्थापनेचा विभाग
१	२	३	४	५	६	७	८	९
१	श्रीमती	आ.स्व.साने (आ.बा.अडवणकर)	१	२०१७	खुला	खुला	नियोजन	मराठी भाषा विभाग
२	श्री	बा.ज्ञा.दळवी	२	२०१७	खुला	खुला	जलसंपदा	सार्वजनिक बांधकाम विभाग
३	श्री	अ.प्र.कांबळे	३	२०१७	खुला	अजा	शाशिवक्रीवि	शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
४	श्रीमती	वि.म.हटकर	४	२०१७	खुला	भज(क)	मववि	महसूल व वन विभाग
५	श्री	शि.ब.आरसूळ	५	२०१७	खुला	खुला	मववि	महसूल व वन विभाग
६	श्रीमती	व.सं.मोरे (व.य.महस्के)	६	२०१७	खुला	अजा	विवि	अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
७	श्री	सं.सं.जाधव	७	२०१७	खुला	खुला	साप्रवि	सामान्य प्रशासन विभाग
८	श्री	वि.गो.भोजने	८	२०१७	खुला	खुला	गृहनिर्माण	गृहनिर्माण विभाग
९	श्री	तु.फा.बटराखाये	९	२०१७	खुला	विमाप्र	साबांवि	सार्वजनिक बांधकाम विभाग
१०	श्रीमती	स्वा.सु.साळवी (स्वा.र.आंजर्लेकर)	१०	२०१७	खुला	इमाव	ग्राविवजसंवि	ग्राम विकास व जलसंधारण विभाग
११	श्री	नि.उ.वाघमारे	११	२०१७	खुला	विमाप्र	विवि	जलसंपदा विभाग
१२	श्रीमती	इ.प्र.लवेकर (भा.गो.घरत)	१२	२०१७	खुला	इमाव	नियोजन	नियोजन विभाग
१३	श्री	सा.शा.भरणे	१३	२०१७	खुला	अजा	जलसंपदा	नगर विकास विभाग
१४	श्री	शे.तु.जाधव	१४	२०१७	खुला	विजा(अ)	साआवि	सार्वजनिक आरोग्य विभाग
१५	श्रीमती	शु.ग.कांबळे	१५	२०१७	खुला	इमाव	मववि	पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग
१६	श्रीमती	म.उ.तुपे (म.शं.घोडिंदे)	१६	२०१७	खुला	इमाव	नियोजन	उच्च व तंत्रशिक्षण विभाग
१७	श्री	प्र.म.भोपळे	१७	२०१७	खुला	इमाव	गृवि	गृह विभाग
१८	श्रीमती	अ.चं.वडे (अ.प्र.कोकणे)	१८	२०१७	खुला	इमाव	कृषिपदुम	महिला व बाल विकास विभाग
१९	श्रीमती	उ.सं.धावणे (उ.प्र.मानकर)	१९	२०१७	खुला	विमाप्र	साप्रवि	पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग

अ.क्र.	श्री/ श्रीमती	कर्मचाऱ्याचे नांव	गुणवत्ता क्रमांक	परीक्षेचे वर्ष	मलोआने ज्या प्रवर्गातून शिफारस केली तो प्रवर्ग	कर्मचाऱ्याचा जाती प्रवर्ग	सध्याचा विभाग	पदस्थापनेचा विभाग
१	२	३	४	५	६	७	८	९
२०	श्री	ल.सु.माने	२०	२०१७	खुला	अजा	विवि	संसदीय कार्य विभाग
२१	श्री	स.श.चौधरी	२१	२०१७	खुला	इमाव	ग्राविवजसंवि	सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
२२	श्री	स.गो.नाईक	२२	२०१७	खुला	खुला	विवि	वित्त विभाग
२३	श्रीमती	वै.चं.तांबे (वै.य.तोस्कर)	२३	२०१७	खुला	इमाव	नियोजन	उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
२४	श्री	अ.गो.काटे	२४	२०१७	खुला	अजा	विवि	वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
२५	श्री	को.शं.बाड	२५	२०१७	खुला	खुला	गृवि	वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
२६	श्रीमती	सु.बा.नाईक	२६	२०१७	खुला	विजा(अ)	साप्रवि	सामान्य प्रशासन विभाग
२७	श्री	बा.मा.जाधव	२७	२०१७	खुला	विजा(अ)	गृवि	गृह विभाग
२८	श्री	सु. सु. परब	२८	२०१७	खुला	खुला	गृवि	आदिवासी विकास विभाग
२९	श्री	स.वि. ढोले	२९	२०१७	खुला	इमाव	साआवि	शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
३०	श्रीमती	आ.ज.मेहेर	३०	२०१७	खुला	विमाप्र	विवन्यावि	विधि व न्याय विभाग
३१	श्रीमती	र.नि.सुर्वे (र.चं.विचारे)	३१	२०१७	खुला	खुला	कृषिपदुम	कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
३२	श्रीमती	म.मं.सावंत (म.द.मोरे)	३२	२०१७	खुला	खुला	विवि	सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग